आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१२ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विजयादशमीचा सण तसंच आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सर्वत्र उत्साह

- दसऱ्यानिमित्त विविध राजकीय पक्षांचे मेळावे/ उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या दसरा मेळाव्यातल्या भाषणांकडे राज्याचं लक्ष

- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीला प्रारंभ/ नागपूर इथं विजयादशमीच्या कार्यक्रमात सरसंघचालकांनी महिलांवरच्या अत्याचारांबद्दल व्यक्त केली चिंता

- प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेचं पोर्टल आजपासून उमेदवारांना खुलं

- बांग्लादेश विरुद्धच्या टी -२० मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताचा प्रथम फलंदाजीचा निर्णय

**आणि**

- नैर्ऋत्य मोसमी पावसाचा मुक्काम लांबला

**<><><><><>**

विजयादशमी म्हणजेच  दसरा सणाने आज शारदीय नवरात्रौत्सवाची सांगता झाली. आजच्या दिवशी शस्त्रांची, उपकरणांची पूजा करुन तसंच आपट्याच्या पानांचं सोनं लुटून सर्वांनी दसरा साजरा केला. विद्यार्थी पाटीवर सरस्वती काढून त्याची पूजा करतात. वाईट प्रवृत्तीवर सत्प्रवृत्तीच्या विजयाचं प्रतीक म्हणून ठिकठिकाणी रावणदहनही केलं जातं. राज्यात विविध ठिकाणी दसऱ्याचा सण

पारंपरिक पद्धतीनं साजरा करण्यात आला. त्याच्या बातम्या आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

कोल्हापूरचा शाही दसरा पारंपरिक उत्साहात साजरा होत आहे. छत्रपती शाहू महाराज यांच्यासह शाही परिवारातले सदस्य आणि इतर मान्यवर कार्यक्रमात भाग घेत आहेत.

**धुळे** शहरात आणि जिल्ह्यात दसरा उत्साहात साजरा करण्यात आला.
दसऱ्यानिमित्त धुळे शहरात ५ ठिकाणी रावण दहन केलं जात आहे.

**यवतमाळ** जिल्ह्यातल्या कळंब तालुक्यामधल्या सुकळी गावच्या जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी आज ‘दसऱ्याचं सोनं, व्यसनमुक्तीचं लेणं’ हा अनोखा उपक्रम राबवला. तंबाखूमुक्त शाळा अभियानांतर्गत या विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश लिहिलेली आपट्याची पानं वाटली.

**<><><><><>**

६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आज राज्यात साजरा होत आहे. १९५६ साली विजयादशमीच्या दिवशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती.

नागपूर इथं आज भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत सामूहिक बुद्धवंदना झाली. यावेळी समता सैनिक दलाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना दिली. धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा सुरु झाला असून उत्तरप्रदेशच्या कुशीनगर इथले भिक्षु संघाचे अध्यक्ष भदंत ए.ए.बी.ज्ञानेश्वर आणि महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे प्रणेते आकाश लामा मुख्य अतिथी म्हणून उपस्थित आहेत. कामठी इथल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संग्रहालयातही धम्मचक्रपरिवर्तन दिन साजरा झाला.  उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माजी मंत्री

सुलेखा कुंभारे, आणि  भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे कार्यक्रमाला उपस्थित होते.

६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आज मुंबईत चैत्यभूमी आणि टिळकनगर सर्वोदय महाबुद्ध विहार इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. भारतीय बौद्ध महासभा आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीच्या वतीने बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पगुच्छ अर्पण करून बुद्धवंदना म्हणण्यात आली. त्यानंतर पंचशील ध्वजारोहण करून समता सैनिक दलाने बाबासाहेबांना मानवंदना दिली. यावेळी आंबेडकरी अनुयायांनी बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचं सामूहिक वाचनही केलं. वाशिम इथं  डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी बौद्ध बांधवांनी बौद्ध वंदना केली 22 प्रतिज्ञांचे वाचन केले.

राज्यात इतरत्रही हा दिवस पारंपरिक श्रद्धेनं साजरा झाला. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आज नांदेड शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर महाबुद्धवंदनेचा कार्यक्रम झाला. यावेळी भिक्खू संघासह हजारो उपासक उपस्थित होते.

**<><><><><>**

विजयादशमीचं औचित्य साधून आज विविध राजकीय पक्षांचे मेळावे होत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिवसेनेचा मेळावा मुंबईत आझाद मैदानावर होत असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा मेळावा शिवाजीपार्क मैदानावर होत आहे. दोन्ही ठिकाणी कार्यकर्त्यांची गर्दी होत हजारोंसाठी आसनव्यवस्था करण्यात आली आहे, तसंच सुरक्षा व्यवस्था

वाढवण्यात आली आहे. गेले तीन दिवस रोज राऊस झाल्यानं दोन्ही मैदानात पाणी साचलं असून आजही दोन्ही मेळाव्यांवर पावसाचं सावट आहे.

भाजपानेत्या पंकजा मुंडे यांनी बीड जिल्ह्यात भगवान भक्तीगड इथं कार्यकर्त्यांच्या दसरा मेळाव्याला संबोधित केलं. लोकसभा निवडणुकीतल्या पराभवाची शिक्का विधानसभा निवडणुकीत पुसून टाकायचा असून त्याकरता आपण राज्यव्यापी दौरा करणार असल्याचं पंकजा मुंडे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दसऱ्यानिमित्त मतदारांशी पॉडकास्टच्या माध्यमातून संवाद साधला. आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यातल्या मतदारांनी बेसावध राहू नये, मतदानाचं शस्त्र योग्य पद्धतीनं वापरून क्रांती करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीला आज प्रारंभ झाला. नागपूर इथं रेशीमबाग मैदानावर आयोजित विजयादशमीच्या मुख्य कार्यक्रमात सरसंघचालक मोहन भागवत यांनी महिलांवरच्या अत्याचारांबद्दल चिंता व्यक्त केली. भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रोचे माजी अध्यक्ष के. राधाकृष्णन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ‘तंत्रज्ञानानं शैक्षणिक संस्थांमध्ये बदल घडवून आणला आहे. नवं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारताला एका समृद्ध अशा ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतरित करेल’, असा विश्वास डॉ राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केला. देशभरातून आलेल्या स्वयंसेवकांच्या पथसंचालनानं या कार्यक्रमाला सुरुवात झाली. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांसह इतर  मान्यवर तसंच संघस्वयंसेवक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><>**

प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेच्या पोर्टलवर आतापर्यंत १९३ कंपन्यांनी ९१ हजार इंटर्नशिप म्हणजेच आंतरवासिता संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. हे पोर्टल आजपासून अर्जदारांसाठी खुलं झालं असून अर्जदार २५ ऑक्टोबरपर्यंत आपले अर्ज सादर करू शकतात. कंपन्या त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आंतरवासिता संधीबाबत या पोर्टलवर माहिती देणार असून यामध्ये तेल, वायू, उर्जा, पर्यटन यासारख्या विविध २४ क्षेत्रांचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ या काळात २१ ते २४ वर्षे वयोगटातल्या सव्वा लाख जणांना आंतरवासिता संधी मिळवून देण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे.

**<><><><>**

आपत्कालीन गर्भनिरोधक गोळ्यांच्या ब्रॅण्डची विक्री आणि वाटपाबाबतच्या नियमात कोणतेही बदल केलेले नसून या गोळ्या डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय यापुढेही मिळणार आहेत, असं स्पष्टीकरण सरकारनं दिलं आहे. शेड्युल एच आणि के मध्ये समावेश असणाऱ्या हार्मोनल म्हणजेच संप्रेरक गर्भनिरोधक गोळ्यांच्या विक्रीसाठी डॉक्टरांची चिठ्ठी लागण्याबाबतचे नियम बदलण्याच्या प्रस्तावाचा काही प्रसार माध्यमं चुकीचा अर्थ लावत असल्याचं केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><>**

जगभरातल्या बालकांना युनिसेफकडून दिल्या जाणाऱ्या आरोग्य आणि पोषण मदतीसाठी योगदान देणारा भारत हा सर्वात मोठा तिसरा देश आहे, असं युनिसेफच्या पुरवठा विभाग संचालक लीला पक्कला यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

बांग्लादेश विरुद्धच्या टी २० मालिकेतला भारताचा तिसरा आणि अखेरचा सामना आज हैदराबादमध्ये सुरु होत आहे. आतापर्यंत झालेले दोन्ही सामने भारतानं जिंकले आहेत. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला.

<><><><><>

महिला क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत न्यूझिलंडने श्रीलंकेवर आठ गडी राखून विजय मिळवला. जॉर्जिया प्लिमरचं अर्धशतक आणि ॲमेलिया केर हिच्या नाबाद ३४ धावांच्या बळावर न्यूझिलंडने अठराव्या शतकात श्रीलंकेचं ११६ धावांचं आव्हान पार केलं.

त्याआधी श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करत ५ गड्यांच्या मोबदल्यात ११५ धावा केल्या. श्रीलंकेकडून चमारी अटापट्टी हिच्या ३५ धावांचा अपवाद वगळता कोणत्याही फलंदाजाला विशेष खेळी करता आली नाही. न्यूझिलंडच्या लेई कॅस्पेरेक आणि ॲमेलिया केर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

<><><><><>

नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातला मुक्काम सध्या लांबला आहे. नंदूरबार जिल्ह्याच्या काही भागातून ५ ऑक्टोबरला मौसमी पाऊस बाहेर पडला. त्यानंतर १० तारखेपर्यंत मध्य महाराष्ट्रातून हा पाऊस बाहेर पडण्याचा अंदाज हवामान

विभागानं वर्तवला होता. पण ५ तारखेनंतर नैऋत्य मौसमी पावसाच्या माघारीच्या प्रवासात काहीही प्रगती झालेली नाही.

दरम्यान, मराठवाड्यातला काही भाग वगळता इतर सर्वत्र आज आणि उद्या वादळीवाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><>**

आगामी सणासुदीच्या काळात होणारी गर्दी लक्षात घेता प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी पनवेल ते नांदेड दरम्यान २४ अतिरिक्त ‘उत्सव विशेष रेल्वे गाड्या’ चालवण्यात येणार आहेत. येत्या २२ ऑक्टोबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान  या रेल्वे धावणार असून येत्या १४ ऑक्टोबर पासून त्यासाठीचं आरक्षण सुरु होत आहे. अधिक माहिती साठी प्रवासी रेल्वेच्या अधिकृत संकेत स्थळाला भेट देऊ शकतात.

**//<><><><><>//**